
**//सुविचार** ‘देवासमोर केवळ प्रार्थनाच करू नका तर ध्यानही करा. प्रार्थनेत आपण देवाशी बोलतो तर ध्यानात देव आपल्याशी बोलतो...’ //



# मशरुम्सची भाजी



**साहित्य :** मशरुम - २०० ग्रॅम, कांदा - १ मध्यम आकाराचा, तिखट - १ चमचा, हळद - १/२ चमचा, मीठ - चवीनुसार, जिरे - १ छोटा चमचा, तेल - फोडणीसाठी, आले-लसूण पेस्ट - १ छोटा चमचा, थोडी कोथिंबीर.

**पाककृती :** कांदा, कोथिंबीर बारीक चिरून घ्या. मशरुम्स उभे पातळ कापून घ्या. फोडणीसाठी तेल गरम करून जिरे, आले-लसूण पेस्ट, कांदा घालून परतून घ्या. कांदा थोडा शिजल्यावर मशरुम्स घालून परतून घ्या. नंतर हळद आणि तिखट घाला. झाकण ठेवून २ मि. शिजू द्या. या वेळात मशरुम्सना पाणी सुटेल, मग मीठ व कोथिंबीर घालून, गॅस मध्यम आचेवर ठेवून हे पाणी आटेपर्यंत शिजू द्या.

# चेहऱ्यावरील तीळ हटवण्याचे आठ घरगुती उपाय

चेहऱ्यावरचा एखादा तीळ ब्यूटीमार्क असू शकतो. परंतु, चेहऱ्यावर अधिक तीळ असल्यास किंवा त्यांची जागा चुकीची असल्यास ते खटकतात. शरीरावरील तीळ काढून टाकण्यासाठी काही डर्मेटोलॉजिक ट्रीटमेंट आहेत, परंतु घरगुती उपायांनीदेखील तीळ हटवले जाऊ शकतात, हे तुम्हाला ठाऊक आहे का?



- कोथिंबीरच्या काही पानांची पेस्ट करा. ही पेस्ट काही दिवस तुम्हांला नको असलेल्या तिळावर नियमित लावा.
- एरंडेल तेलाच्या मॉलिशमुळेदेखील तिळापासून सुटका मिळू शकते. हळूहळू तीळ कमी होण्यास सुरूवात होईल.
- मध आणि सूर्यफूलाच्या बीयांच्या तेलाचे मिश्रण करा. या मिश्रणाचा तीळावर पाच मिनिटं मसाज करा. यामुळे त्वचा तजेलदार होईल सोबतच तिळ कमी होण्यास मदत होईल.



- कपभर अननसाचा रस आणि पाव कप सैंधव मीठ एकत्र करा. या मिश्रणाने स्क्रब केल्यास चेहऱ्यावरील तीळ कमी होण्यास मदत होईल.
- लसणाची पेस्ट रात्री झोपण्यापूर्वी तिळावर लावा. त्यावर बॅण्डेज लावा. सकाळी उठल्यावर त्वचा कोमट पाण्याने स्वच्छ धुवा. हा प्रयोग नियमित केल्यास तिळाचा त्रास कमी होण्यास मदत होईल.
- काही आल्याचे तुकडे ठेचून तिळाच्या जागी लावा. त्यावर कपडा बांधून झोपा. या उपायानेही तीळ कमी होण्यास मदत होते.
- व्हिटॅमिन सीची एक गोळी बारीक कुटा. रात्री ही पेस्ट तिळावर लावून, त्यावर बॅण्डेज लावून झोपा.
- व्हिनेगरचा वापर करूनदेखील तीळ हटवला जाऊ शकतो. सुरुवातीला चेहरा गरम पाण्याने धुवा. कापसाच्या बोळ्याने व्हिनेगर तिळावर लावा. १० मिनिटांनंतर चेहरा गरम पाण्याने स्वच्छ धुवावा.

# मधुमेह आणि फळे

**मधुमेह हा आजार असलेल्या व्यक्तींनी आहाराबाबत सजग राहणे आवश्यक असते. फळांचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे , अन्यथा या फळांच्या सेवनाने रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. बऱ्याच जणांचा असा गैरसमज असतो की फळांमध्ये नैसर्गिक साखर असल्याने रक्तातील साखर वाढत नाही. फळे सेवन केलेली चालतात, असे मानून मधुमेहाचे रुग्ण फळांचे सेवन करतात. पण फळांमध्ये असलेली नैसर्गिक साखर हानीकारक ठरू शकते.**



**चेरी :** चेरीमध्ये खूप जास्त साखर असते, त्यामुळेच आईस्क्रीम आदी गोष्टी तयार करण्यासाठी चेरीचा वापर केला जातो. एका चेरीमध्ये सुमारे ८ ग्रॅम साखर असते, त्यामुळे चेरीचे सेवन करताना काळजी घेतली पाहिजे आणि विशिष्ट प्रमाणातच चेरीचे सेवन केले पाहिजे. चेरीच्या सेवनाने रक्तातील शर्करेची पातळी वाढू शकते.

**आंबा :** आंबा हा वर्षातून एकदाच मिळणाऱ्या फळांपैकी एक आहे आणि बहुतेकांना आंबा खूप आवडतो. परंतु त्यातही नैसर्गिक साखरेचे प्रमाण अधिक असते. त्यामुळे मधुमेहाच्या रुग्णांनी आंब्याचे सेवन करणे शक्यतो टाळले पाहिजे. सर्वसाधारणपणे एका आंब्यामध्ये ४५ ग्रॅम इतकी नैसर्गिक साखर असते.

**द्राक्षे :** रक्तातील साखरेची पातळी योग्य राखायची असेल, तर द्राक्षांचे सेवन करणे टाळावे. कारण द्राक्षही गोड असतात. एक कप द्राक्षांतून शरीरात २३ ग्रॅम साखर जाऊ शकते.

**लिची :** हे फळही जास्त साखरेचे प्रमाण असलेल्या फळांपैकी एक आहे. त्यामुळे रक्तातील साखर वाढू शकते. एक कप लिची फळांमध्ये २९ ग्रॅम एवढी नैसर्गिक साखर असते.

**डाळिंब :** डाळिंब रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण वाढवते, परंतु त्यातही साखरेचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे सेवन केल्यास मधुमेही रुग्णांमध्ये रक्तातील साखरेचे प्रमाण वाढू शकते. एका साधारण आकाराच्या डाळिंबामध्ये ३९ ग्रॅमपर्यंत साखर असते. मधुमेही रुग्णांनी डाळिंबाचे सेवन टाळले पाहिजे.

मधुमेही रुग्णांनी वरील फळे टाळावी तसेच कोणतेही इतर फळ सेवन करताना विशिष्ट प्रमाणातच सेवन करावे, जेणेकरून रक्तशर्करेचे प्रमाण योग्य राहील. मधुमेही रुग्णांना रक्तातील साखर कमी होऊ द्यायची नसते, तशीच ती वाढूनही उपयोग नाही, त्यामुळे ठरावीक वेळेला आहार सेवन करतानाही तो योग्य प्रमाणात सेवन केला पाहिजे.

# व्यायामानंतर खाज येत असल्यास...

**खाज** येण्याच्या समस्येला प्रुराइटस देखील म्हटले जाते. व्यायामादरम्यान खाज आल्याने त्वचेच्या पेशींना त्रास होतो किंवा इरिटेशन होते. सर्वसाधारणपणे अचानक तापमानात झालेले बदल, संसर्ग किंवा सौंदर्यप्रसाधनांची प्रतिक्रिया यामुळे हे होते. काही व्यक्तींमध्ये प्रतिकारशक्ती कमजोर असल्यास ही लक्षणे दिसतात. अशाच प्रकारे जेव्हा आपण वेगात चालतो तेव्हा किंवा थंड जागेवरून गरम जागी जातो आणि थोडे श्रम करतो, तेव्हा खाज येऊ शकते. शरीरातील नसांमध्ये प्रुरिसेप्टर्स असतात. जेव्हा वातावरणात अचानक बदल होतो किंवा त्वचेवर कोणतीही रासायनिक प्रतिक्रिया दिसते, तेव्हा हे प्रुरिसेप्टर्स कार्यान्वित होतात आणि मेंदू आणि मणका यांना संकेत पाठवतात. त्या संकेतांऐवजी मेंदू शरीरात अशा प्रकारच्या रसायनांची निर्मिती सुरू करतो जी या शारीरिक अवस्थेशी निपटण्यासाठी आवश्यक असते. शरीराची ही प्रतिक्रिया समजण्यासाठीच खाज येण्याची समस्या सुरू होते. शरीरांतर्गत रसायनांमुळेही पित्ताची समस्या निर्माण होते.

**खाज कशी दूर करावी?**

- व्यायामादरम्यान किंवा वेगाने चालताना किंवा अतिश्रम केल्यास शरीराला खाज येत असल्यास व्यायाम आणि श्रमाचे काम ताबडतोब थांबवा. एखाद्या उष्ण जागी असाल तर थंड जागी जाऊन थांबा. अशा परिस्थितीत हिवाळ्यापासून बचाव करण्यासाठी उबदार कपडे घातले असतील तर तेही काढून टाका आणि शरीराचे तापमान सर्वसामान्य कसे करता येईल यासाठी प्रयत्न करा. सतत खाज येत असेल तर वैद्यकीय सल्ला अवश्य घ्यावा.
- थंडीमुळे होणाऱ्या पित्ताने वैतागला असाल तर थंड पाण्याचा शेक घ्या. त्यामुळे रक्तवाहिन्या संकुचित होतात आणि हिस्टामिन या रसायनांचे अतिरिक्त वहन थांबवण्यास मदत करते. त्याचबरोबर पित्तामध्ये खाज येत असेल तर त्यावर उपाय म्हणून अर्धा कप दलिया पाण्याच्या टबात टाकून त्याने स्नान करावे.
- याखेरीज एका वाटीत २ चमचे बेकिंग सोडा घ्यावा आणि त्यात पुरेसे पाणी मिसळावे. ही पेस्ट करून खाज येणाऱ्या जागी लावावी तसेच जिथे पित्त उठले आहे त्यावरही लावावे.



# व्हॉट्सअॅप स्टेट्समध्ये शेअर करा एचडी फोटो आणि व्हिडीओ! आलं नवीन फीचर

**व्हॉट्सअॅपने एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला आहे. आता व्हॉट्सअॅप फोटो आणि व्हिडीओ स्टेट्समध्ये देखील क्वालिटी न बिघडवता शेअर करता येईल. हे फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ मध्ये उपलब्ध आहे.**

व्हॉट्सअॅपने अलीकडेच हाय डेफिनिशन म्हणजे एचडी क्वालिटीमध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअरिंगचा अपडेट दिला होता. त्यानंतर आता व्हॉट्सअॅप एक नवीन अपडेटमधून एचडी फोटो व्हिडीओ स्टेट्स अपडेट करण्याचा ऑप्शन देत आहे. म्हणजे तुम्ही एचडी फॉर्मेटमध्ये फोटो आणि व्हिडीओ आपल्या व्हॉट्सअॅप स्टेट्सवर शेअर करू शकाल. सध्या स्टेट्समध्ये फोटो आणि व्हिडीओ शेअर केल्यावर त्याची क्वालिटी



खराब होते. परंतु आता व्हॉट्सअॅप फोटो व्हिडीओ शेअर केल्यावर त्यांची क्वालिटी खराब होणार नाही.

**बीटा टेस्टरसाठी लाइव्ह झालं फीचर**

नवीन एचडी फोटो आणि व्हिडीओ शेअरिंग फीचर अँड्रॉइड बीटा व्हर्जन २.२३.२६.३ साठी सादर करण्यात आलं आहे. यात जेव्हा तुम्ही व्हॉट्सअॅप स्टेट्स शेअर कराल, तेव्हा तुम्हाला एचडी आयकॉन दिसेल, ज्याच्या मदतीने एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेट्स शेअर करता येतील. व्हॉट्सअॅपच्या एचडी स्टेट्सची सुविधा बीटा व्हर्जनमध्ये उपलब्ध आहे. सध्या याचा वापर बीटा टेस्टर करू शकतात. परंतु लवकरच हे फीचर सामान्य युजर्ससाठी उपलब्ध होईल, अशी अपेक्षा आहे.

**कसं वापरायचं एचडी फोटो-व्हिडीओ शेअरिंग फीचर**

- सर्वप्रथम तुम्हाला व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करावं लागेल. गुगल प्ले स्टोअरवरून व्हॉट्सअॅपचं बीटा व्हर्जन डाऊनलोड करता येतं.
- यासाठी प्ले स्टोअरवर व्हॉट्सअॅप पेज स्क्रोल डाऊन करा. त्यानंतर बीटा टेस्टर सेक्शनमध्ये जा.
- पुढे जॉईन ऑप्शनवर क्लिक करा.
- बीटा टेस्टरनंतर अपडेट आणि त्याची उपलब्धता चेक करा.
- त्यानंतर व्हॉट्सअॅप अपडेट करून ओपन करा.
- अपडेट झाल्यावर नेहमीप्रमाणे तुमचे फोटोज किंवा व्हिडीओ स्टेट्सला शेअर करा आणि शेअर करताना ‘एचडी’ ऑप्शन निवडा.

**नोट - जर तुम्ही बीटा टेस्टर नसाल तर सध्या तुम्हाला एचडी फोटो आणि व्हिडीओ स्टेटस शेअरिंग ऑप्शनसाठी थोडी वाट पाहावी लागेल. जेव्हा हे फीचर लाइव्ह होईल, तेव्हा तुमच्या व्हॉट्सअॅपमध्ये उपलब्ध होईल. यासाठी सिम्पल व्हॉट्सअॅप अपडेट करावं लागेल, म्हणजे तेव्हा बीटा टेस्टर बनण्याची गरज नसेल.**

# “तुझ्यासारखा तूच चिन्मय...”, नेहा जोशी-मांडलेकरने नवऱ्यासाठी लिहिली खास पोस्ट



सध्या चिन्मय मांडलेकर लिखित-दिग्दर्शित ‘गालिब’ हे नाटक रंगभूमी गाजवतं आहे. ‘गालिब’ या नाटकाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अभिनेत्री गौतमी देशपांडे व अभिनेता विराजस कुलकर्णी यांनी या नाटकात प्रमुख भूमिका साकारली आहे. चिन्मयच्या या नाटकाला अनेक पारितोषिक मिळत आहेत. नुकतंच त्याचा ‘गालिब’ नाटकासाठी दीनानाथ मंगेशकर पुरस्कार सोहळ्यात गौरव करण्यात आला. दीनानाथ मंगेशकर यांच्या ८२व्या पुण्यतिथीनिमित्ताने काल, २४ एप्रिलला प्रतिष्ठित दीनानाथ मंगेशकर पुरस्कार सोहळा पार पडला. यावेळी मानाचा लता दीनानाथ मंगेशकर हा पुरस्कार महानायक अमिताभ बच्चन यांना प्रदान करण्यात आला. तसंच अशोक सराफांना मास्टर दीनानाथ मंगेशकर प्रदीर्घ नाट्यसेवा पुरस्काराने गौरविण्यात आलं. याच वेळी अभिनेता चिन्मय मांडलेकर लिखित, दिग्दर्शित ‘गालिब’ या नाटकाला उत्कृष्ट नाट्यनिर्मितीसाठी मोहन वाघ पुरस्कार उषा मंगेशकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. याचविषयी चिन्मयची पत्नी नेहा जोशी-मांडलेकरने सोशल मीडियावर खास पोस्ट लिहिली आहे. चिन्मयला पुरस्कार प्रदान करतानाचा व्हिडीओ शेअर करत नेहाने लिहिलं आहे, “तू माझा नवरा आहेस याचा फक्त आणि फक्त अभिमान आहे. तुझ्यासारखा तूच चिन्मय. इतकं विनय, इतकी विनम्रता. हे सगळं तूच करू जाणे...” पुढे नेहाने लिहिलं, “मास्टर दीनानाथ स्मृती प्रतिष्ठान - सर्वोत्कृष्ट नाट्यनिर्मितीचा बहु सन्माननीय श्री मोहन वाघ पुरस्कार आज ‘गालिब’ नाटकला दिला गेला...नाटकाच्या टीमचे अभिनंदन. हा पुरस्कार विशेष आहे. कारण मंगेशकरच्या आडनावाने मिळालेला कोणताही पुरस्कार खास असतो. दिवंगत मोहन वाघ पुरस्कार चिन्मयने स्वीकारला. अमिताभ बच्चन यांच्या उपस्थितीत त्याला पुरस्कार प्रदान करण्यात आला. चिन्मय तुझा खूप खूप अभिमान वाटतो.” दरम्यान, सध्या चिन्मय मांडलेकर हे नाव खूप चर्चेत आहे. कारण आहे त्याच्या मुलाचं नाव. चिन्मयने मुलाचं नाव “जहांगीर” ठेवल्यामुळे त्याला ट्रोल केलं जात आहे. त्याच्या पत्नीला “भारत सोडून जा,” असे मेसेज केले जात आहेत. यावरून काही दिवसांपूर्वी नेहाने व्हिडीओ शेअर केला होता. ज्यामध्ये तिनं आपलं स्पष्ट मत व्यक्त केलं होतं.

## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ६६

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | | | 4 | 9 | | 3 | 6 | |
| | 8 | 3 | | | | 9 | | 4 |
| 2 | 4 | | | | 7 | | | |
| | 5 | | | | 9 | 6 | 8 | |
| 8 | | 6 | | | 3 | 7 | | |
| | 1 | | | 8 | | | 5 | |
| | | | 6 | | 1 | 4 | | |
| 1 | 3 | 2 | | 7 | | | 9 | |
| 4 | | | | 5 | | | | |

## उत्तर सुडोकू -६५

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 7 | 3 | 5 | 2 | 4 | 6 | 9 | 8 | 1 |
| 6 | 8 | 9 | 7 | 3 | 1 | 5 | 2 | 4 |
| 4 | 1 | 2 | 9 | 5 | 8 | 3 | 6 | 7 |
| 2 | 4 | 6 | 1 | 9 | 3 | 8 | 7 | 5 |
| 3 | 5 | 7 | 4 | 8 | 2 | 1 | 9 | 6 |
| 1 | 9 | 8 | 5 | 6 | 7 | 2 | 4 | 3 |
| 8 | 6 | 1 | 3 | 7 | 9 | 4 | 5 | 2 |
| 9 | 2 | 4 | 6 | 1 | 5 | 7 | 3 | 8 |
| 5 | 7 | 3 | 8 | 2 | 4 | 6 | 1 | 9 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# नवा साहेब, घड्याळ तेच; पुन्हा वेळ पाळू का? की...' राजकारण्यांच्या डोळ्यात अंजन घालणारा संकर्षण



अभिनेता संकर्षण कऱ्हाडे मराठी मनोरंजन विश्वातील एक लोकप्रिय चेहरा आहे. मराठी मालिका, 'आम्ही सारे खवय्ये'सारखे कार्यक्रम, विविध पुरस्कार सोहळे याद्वारे संकर्षणने मोठा चाहतावर्ग कमावला आहे. याशिवाय तो अभिनय आणि दिग्दर्शन करत असलेली विविध मराठी नाटकं रंगभूमी गाजवत आहेत. प्रेक्षकांचा भरभरुन प्रतिसाद या नाट्यकलाकृतींना मिळतो. दरम्यान तुम्हाला माहीत आहे का संकर्षण एक उत्तम कवीदेखील आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून किंवा त्याच्या विविध कार्यक्रमांमध्ये त्याच्या कविता सादर करतो. अभिनेत्री स्पृहा जोशीसह त्याचा एक कवितांचा कार्यक्रमही आहे. 'संकर्षण व्हाया स्पृहा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून दोघे विविध कविता सादर करतात. या दरम्यान अभिनेत्याने राजकीय परिस्थितीवर भाष्य करणारी एक चपखल कविता सोशल मीडियावर चांगलीच चर्चेत आली आहे. संकर्षणने ही कविता सादर करतानाचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. या व्हिडिओसाठी त्याने असे कॅप्शन दिले की, 'नमस्कार, सध्याच्या राजकीय परिस्थितीवर काही लिहिण्याचा मनापासून प्रयत्न केला आणि प्रेक्षकांनी काल तो प्रयत्न अगदी मनापासून स्विकारला. तुम्हीही ऐका, पाहा आणि मनापासून सांगा की तुमच्याही मनांत हेच आहे का?'

**काय म्हणाला संकर्षण**

ही कविता सादर करण्याआधी संकर्षण असंही म्हणाला की, 'ही कविता तुमच्यासाठी नाहीये, ही सर्वसाधारण लोकांसाठी आहे. कारण तुम्ही कसे भारी आहात... खरंच भारी नाहीत का? कारण तुम्हाला आता कशासंच काही वाटत नाही. तुम्हाला आपलं नुकसान झालं, याचंही काही वाटत नाही. तुम्हाला कसला आता फरकच पडत नाही.' त्याने सर्वसामान्यांना उद्देशून असंही म्हटलं की बघा तुम्हाला समजून घेता येतंय का? महाराष्ट्रातील राजकारण सध्या देशपातळीवर चर्चेत आहे. या परिस्थितीला उद्देशून संकर्षणने ही कविता सादर केली, ज्यावर सोशल मीडियावरही चांगला प्रतिसाद मिळतो आहे. अनेकांनी ही कविता अत्यंत चपखल असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

# दिनविशेष

## २६ एप्रिल

- १९०३: अटलेटिको माद्रिद असोसिएशन फुटबॉल क्लबची स्थापना झाली.
- १९३३: नाझी जर्मनीच्या गेस्टापो या गुप्त पोलिसदलाची स्थापना झाली.
- १९६२: रेंजर-४ हे नासाचे यान चंद्रावर कोसळ्ले.
- १९६४: टांगानिका झांजीबार मिळून टांझानिया देश तयार झाला.
- १९७०: जागतिक बौद्धिक मालमत्ता संघटना स्थापन करणारया अधिवेशनाची अंमलबजावणी झाली.
- १९७३: अजित नाथ रे भारताचे १४ वे सरन्यायाधीश झाले.
- १९८६: रशियातील चेर्नोबिल येथील अणुभट्टीत भीषण स्फोट होऊन किरणोत्सारी पदार्थ वातावरणात फेकले गेले.
- १९८९: बांगलादेशमधे चक्रीवादळामुले सुमारे १,३०० लोक ठार, १२,००० जखमी आणि ८०,००० बेघर झाले.
- १९९५: आशियाई विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत भारताच्या निशा मोहोताने इंटरनॅशनल वुमन मास्टर किताब मिळ्वला.
- २००५: आंतरराष्ट्रीय समुदायाच्या दबावामुळे सीरीयाने लेबाननमधुन सैन्य काढुन घेतले.
- १४७९: पुष्टिमागार्चे संस्थापक वल्लभाचार्य यांचा जन्म.
- १९००: रिश्टर तीव्रता प्रमाणचे जनक चार्लस रिश्टर यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर १९८५)
- १९०८: भारताचे १३ वे सरन्यायाधीश सर्व मित्र सिकरी यांचा जन्म. (मृत्यू: २४ सप्टेंबर १९९२)
- १९४०: भारतीय मोल्वी आणि राजकारणी मोल्वी इफ्तिखार हुसैन अन्सारी यांचा जन्म. (मृत्यू: ३० सप्टेंबर २०१४)
- १९४८: अभिनेत्री मौशमी चटर्जी यांचा जन्म.
- १९७०: अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची पत्नी मेलानिया ट्रम्प यांचा जन्म.
- १९२०: थोर भारतीय गणिती श्रीनिवास रामानुजन यांचे निधन. (जन्म: २२ डिसेंबर १८८७)
- १९७६: साहित्यिक चिंतामणी त्र्यंबक खानोलकर ऊर्फ आरती प्रभू यांचे निधन. (जन्म: ८ मार्च १९३०)
- १९८७: शंकर-जयकिशन या जोडीतील संगीतकार शंकरसिंग रघुवंशी यांचे निधन. (जन्म: ५ ऑक्टोबर १९२२)
- १९९९: लोकशाही पद्धतीने निवडण्यात आलेले नेपाळचे पहिले पंतप्रधान मनमोहन अधिकारी यांचे निधन. (जन्म: २० जून १९२०)

# भविष्य

**मेष** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळहोणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल.महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील.वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील.वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

## संपादकीय

# मुद्यावर बोलू काही...

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडल्यानंतर उर्वरित ठिकाणच्या मतदारसंघांतून प्रचाराचे घमासान सुरू आहे. १ जूनपर्यंत प्रचाराचा माहोल सुरू राहणार आहे. निवडणुका आल्या की राजकीय आरोप-प्रत्यारोप ओघाने आलेच! पण उमेदवारांनी देशातील महत्त्वाच्या मुद्यावरही बोलावे, अशी अपेक्षा असते. लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने होणाऱ्या प्रचारातून तरी ही अपेक्षा खचितच अधिक असते. दुर्दैवाने आपल्याकडे निवडणुकांचा महाउत्सव सुरू झाला की 'शिमागोत्सव' सुरू होतो. एकमेकांची उणीदुणी काढण्यातच भाषणातील निम्म्याहून अधिक वेळ खर्ची होत आहे. याला गल्लीतील नेत्यापासून देशाच्या पंतप्रधानापर्यंत कुणी अपवाद नाही. विरोधकांवर तुटून पडताना वापरली जाणारी भाषा अनेकदा खालच्या पातळीवर जाते. या देशातील सर्व प्रश्न मिटले असून फक्त 'विरोधक' इतकाच विषय उरलाय असाच जणू प्रचाराच्या भाषणाचा सूर असतो. प्रगत राष्ट्रांतून निवडणुकीचा प्रचार राष्ट्रीय मुद्यांवर होत असतो. त्यात आर्थिक, परराष्ट्र धोरणासह अन्य संवेदनशील विषयांवर चर्चा होते. भारतात याच्या विरोधी चित्र आहे. देशात अनेक विषय असताना राजकीय उखाळ्या-पाखाळ्या काढण्यात उमेदवारांचा, नेत्यांचा वेळ जात आहे. अठराव्या लोकसभेसाठी निवडणूक होत असताना याचा प्रत्यय येत आहे. दस्तुरखुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विरोधकांवर तोंडसुख घेताना कुठे कमी पडताना दिसत नाहीत. विरोधकांनी देशातील बेकारी, महागाई यासह देशाच्या अशांत सीमांबाबत कोणते मुद्दे उपस्थित केले तर पंतप्रधानांनी त्यावर मुद्देसूदपणे बोलावे, अशी अपेक्षा आहे, मात्र नरेंद्र मोदी यांचा बराचसा वेळ विरोधकांची टर उडविण्यातच जात आहे. खरं तर आताच्या नवमतदाराला यात स्वारस्य असेल, असे संभवत नाही. देशाच्या अर्थव्यवस्थेबाबत निवडणुकीच्या निमित्ताने व्यवस्थित चर्चा व्हावी, अशी अपेक्षा आहे. देशाच्या अर्थव्यवस्थेचे गुलाबी चित्र सत्ताधारी रंगवत असतात तेव्हा त्याला विरोधी पक्षांकडून आक्षेप घेतला जात असतो. यातील खरं काय हे सामान्य माणसाला कधीच समजत नसते. देशाच्या अर्थव्यवस्थेबद्दल दोन्ही बाजूकडून प्रभावीपणे विश्लेषणाची गरज आहे. इथे ईडी, आयटी, सीबीआय यावर अधिक बोलले जाते. राष्ट्रीयीकृत बँकांना लाखो कोटींचा गंडा घालून परदेशात परागंदा झालेल्यांचे पुढे काय, या विषयात जनतेला रस आहे, पण त्यावर फक्त एकमेकांवर आरोप करण्यातच धन्यता मानली जात आहे. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर काश्मीरमध्ये पुलवामा हल्ल्याची घटना घडली, मात्र पुलवामा घटनेशी संबंधित प्रश्नांची अद्याप उत्तरे मिळत नसल्याचे सांगून सोलापूर लोकसभा मतदारसंघातील काँग्रेसच्या उमेदवार प्रणिती शिंदे यांनी पंतप्रधानांना लक्ष्य केले. अर्थात सोलापुरातून पुलवामाचा विषय काढण्यापेक्षा शिंदे यांनी स्थानिक विषयांना प्राधान्य द्यावे, असा सूर त्यानंतर उमटला. यात तथ्यही आहे. कारण शिंदे यांच्या प्रश्नावर पंतप्रधान मोदी उत्तर देतील, ही अपेक्षा ठेवणेच मुळी व्यर्थ आहे. गेल्या काही दिवसांपासून चीनच्या वाढत्या कुरापतीवरून विरोधी पक्षांनी सत्ताधाऱ्यांवर टीकेचा भडिमार केला असला तरी त्यावरही कोणतेच मुद्देसूद उत्तर मिळालेले नाही. या निवडणुकीच्या निमित्ताने देशाच्या परराष्ट्र धोरणाबाबत चर्चा होण्याची गरज आहे. चीनकडून शेजारी देशांना भारताविरोधात फूस लावली जात असताना त्यावर कुणीच काही बोलत नाही. पंतप्रधान तर यावर कोणतेच भाष्य करण्यास तयार नाहीत. स्थानिक पातळीवरही प्रचारातील भाषा कशी असावी याचे बिलकूल ताळतंत्र राहिलेले नाही. लोकसभेची निवडणूक असल्याने प्रचाराची पातळी भारदस्त असावी, अशी अपेक्षा करणे तद्दन मूर्खपणाचे लक्षण ठरेल. विकासाच्या मुद्यावर बोलण्याऐवजी एकमेकांचे वस्त्रहरण करण्यातच धन्यता मानण्यात येत आहे. नेते बाष्कळ बोलत असताना उमेदवारांनी तरी मुद्देसूद बोलावे, पण तेही होत नाही. मीच कसा सर्वश्रेष्ठ ( ! ) हेच पटवून देण्यात उमेदवारांचा वेळ जात आहे. जुन्या कुठल्या तरी विषयांवरून सभेत समोर बसलेल्यांचे मनोरंजन केले जात आहे. असे मनोरंजन करण्यामध्ये कोणताही पक्ष मागे नाही. महाराष्ट्रातही अनेक प्रश्न आहेत. त्यावर कुठेच चर्चा होताना दिसत नाही. निसर्गाचा लहरीपणा, अवकाळी पाऊस यामुळे शेतीचा बट्ट्याबोळ झालेला आहे. त्यावर कुणीही काहीच बोलत नाही. उमेदवार आणि राजकीय नेते शेती आणि शेतकरी या विषयावर बोलत नसल्याने मोठी नाराजी आहे. शेतकऱ्यांना भूलथापा नकोत, तर ठोस कार्यवाही हवी आहे. अवकाळीमुळे दुष्काळाचे सावट आहे. त्याबाबत दोन दिलासादायक शब्द कुणी बोलण्यास तयार नाही. राज्यात लाखो तरुण नोकरीच्या शोधात वणवण करीत आहेत. ज्यांना नोकऱ्या आहेत त्या कायम नाहीत. बेकारी हटविण्यासाठी राजकारण्यांकडे कोणतीही दूरदृष्टी नाही. फक्त नोकऱ्यांचा प्रश्न सोडवू अशा टाळ्याखाऊ वाक्यावर बेरोजगार तरुणांची चेष्टा केली जात आहे. पाणीटंचाईचा प्रश्न उग्र आहे. पाण्याची टंचाई कायमस्वरुपी संपुष्टात आणण्यासाठी कोणत्याच राजकीय पक्षाकडे कार्यक्रम नाही. 'या निवडणुकीत प्रतिस्पर्ध्याला पाणी पाजल्याशिवाय राहणार नाही' अशी शब्दफेक करून राज्यातील पाणीप्रश्न सुटणार नाही. राजकारणात आरोप-प्रत्यारोप होणारच हे खरं आहे, परंतु निवडणुकीची संधी साधून प्रत्येक विषयावर अभ्यासपूर्ण बोलण्याची तसदी कोणत्याच पक्षाकडून घेतली जात नाही. उद्या यातलेच कुणीतरी खासदार असणार आहेत. संसदेत गेल्यावर ते एखाद्या विषयावर अभ्यासपूर्ण बोलतील याची कुणालाही खात्री नाही. गेल्या काही वर्षांतील संसदेतील गोंधळी खासदारांचे वर्तन देशाने पाहिले आहे.

# लोकशाही जपण्यासाठी मतदान केलेच पाहिजे

भारताच्या स्वातंत्र्यानंतर सर्व भारतीय महिला आणि पुरुष दोघांना एकाचवेळी मतदानाचा हक्क मिळाला. भारतीय लोकशाहीतील ही गोष्ट युरोपियन आणि अमेरिकन देशांपेक्षा अधिक प्रगल्भ मानली गेली. कारण युरोपियन-अमेरिकन देशात महिला, कामगार, स्थलांतरितांना मतदानाचा हक्क मिळवण्यासाठी अनेक वर्षे संघर्ष करावा लागला होता. अमेरिकेतील महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी १४४ वर्षे लागली. ब्रिटनमधल्या महिलांना हा हक्क मिळायला १०० वर्षे वाट पाहावी लागली. स्वित्झर्लँड मधील महिलांना मत देण्याचा अधिकार १९७४ साली मिळाला. याउलट भारतीय महिलांना त्यादिवशीच मतदानाचा अधिकार मिळाला.

भारताने राज्यघटना स्वीकारल्यापासून देशातील २१ वर्षांवरील प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा हक्क मिळाला होता. लोकशाही नागरिकत्वाच्या सर्वात मूलभूत घटकांपैकी एक म्हणून मतदानाच्या अधिकाराचा विचार केला जातो. लोकशाही उत्क्रांतीच्या काळात जगभरात राजकीय अभिजात वर्गाने मतदानाचा अधिकार अनेकदा रोखून धरला होता. स्त्रिया, वांशिक अल्पसंख्यांक आणि गरीब लोकांना नियमितपणे मतदान नाकारले गेले, कारण या वर्गातील लोकांना मतदानाचा अर्थ कळणार नाही आणि त्यांना मतदानाच्या शक्तीचा वापरही करता येणार नाही अशी धारणा होती. भारताने मात्र खूप वेगळा मार्ग निवडला. संविधानाच्या चौकटीत सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या तत्त्वाची सुरुवात झाली. भारतीय राजवटीत प्रत्येक प्रौढ व्यक्तीला मतदानाचा अधिकार देण्यात आला होता. दारीद्र्य आणि निरक्षरतेच्या पातळीने ग्रासलेल्या, जात, वर्ग आणि लिंग भेद-भावांनी त्रस्त झालेल्या देशात, हा खरोखरच एक क्रांतीकारक बदल होता.

सुकुमार सेन हे भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होते. त्यांनी १९२१ मध्ये भारतीय नागरी सेवेत प्रवेश केला. भारताचे पहिले निवडणूक आयुक्त होण्याआधी ते जिल्हाधिकारी होते. १९५२ च्या सुरुवातीला देशात सार्वत्रिक निवडणुका घेण्याचा निर्णय झाला. पहिली सार्वत्रिक निवडणूक घेण्यासाठी देशासमोर भौगोलिक आणि सामाजिक अशी दोन प्रमुख आव्हाने होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतातील महिलांना मतदानाचा अधिकार देण्याच्या मुद्द्यावर अधिक जोर दिला. भारत स्वतंत्र झाला तेव्हा आपल्या समाजात महिलांवर अनेक बंधनं होती. उत्तर भारतात विशेषतः राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश या ठिकाणी महिलांना अनोळखी लोकांशी बोलायला मनाई होती. याशिवाय गावात महिलांची ओळख त्यांच्या घरातील पुरुषांच्या नावावरून करून दिली जात होती. मतदारयाद्या तयार करतानाच निवडणूक आयोगाच्या लक्षात आले की काही राज्यांमध्ये मोठ्या संख्येने महिला मतदारांची नोंदणी त्यांच्या स्वतःच्या नावाने नाही, तर त्यांच्या पुरुष नातेसंबंधाच्या वर्णनावरून झाली आहे. निवडणूक आयोगाचे कर्मचारी जेव्हा घरोघरी जाऊन नोंदणी करू लागले तेव्हा अनोळखी व्यक्तींसमोर या महिलांनी त्यांची योग्य नावे उघड करण्यास चक्क नकार दिला होता. ही बाब सुकुमार सेन यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी पहिली लोकसभा निवडणूक होण्याआधी पुन्हा एकदा मतदार यादी तयार करण्याचे आदेश दिले. ''नावासह पुरेसा तपशील दिल्याशिवाय कोणत्याही मतदाराची नोंदणी केली जाऊ नये,'' अशी सक्त नोटीस सुकुमार सेन यांनी दिली होती. अधिकाधिक महिलांनी मतदान करावं यासाठी मतदार नोंदणीसाठी मुदतवाढ देण्यात आली. मोठ्या प्रमाणात अभियान राबवण्यात आले. राजस्थान आणि बिहारमध्ये मतदार यादीतील महिलांची नावे दुरुस्त करण्यासाठी एक महिन्याची मुदतवाढ देण्यात आली. एवढं सगळं करूनही लोकांकडून अत्यंत कमी प्रतिसाद मिळाला. शेवटी ४ कोटी महिला मतदारांपैकी २८ लाख महिलांनी आपले खरे नाव देण्यास नकार दिला. त्यामुळे शेवटी मतदार यादीत त्यांची नावे नाईलाजाने काढून टाकण्यात आली.




मतदानाचा अधिकार हा भारतासारख्या लोकशाही देशाचा महत्त्वाचा भाग आहे. आपल्या देशात अनेकजण मत देण्यास पात्र आहेत, तर काही लोक त्याबद्दल उत्साही आहेत. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ६७.११% मतदान झाले होते जे भारताच्या इतिहासातील सर्वात जास्त मतदान होते. देशाची राज्यघटना तयार करतेवेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पंडित जवाहरलाल नेहरू हे भारतातल्या सरसकट सर्व नागरिकांना मतदानाचा हक्क द्यावा याबाबत आग्रही होते. परंतु काही नेत्यांनी मात्र मर्यादित लोकांनाच हा अधिकार असावा असे मत मांडले. यावर बरेच वाद झाले. सरसकट सर्वांना मतदानाचा अधिकार दिल्याने त्याचे दुष्परिणाम होतील. असे काही नेत्यांच्या मत होते. या लोकांचे म्हणणे ऐकून भारतातला मतदानाचा अधिकार सुशिक्षित लोकांपुरताच मर्यादित केला गेला असता तर फार विचित्र स्थिती निर्माण झाली असती. केवळ सुशिक्षितांनाच मतदानाचा अधिकार असेल असा निर्णय घेतला गेला असता तर देशातली मतदानाची टक्केवारी ३० किंवा ४० टक्केच राहिली असती. परंतु आजची परिस्थिती अशी आहे की, फक्त ज्यांना मतदानाचा अधिकार असावा असा आग्रह धरला जात होता तेच सुशिक्षीत आणि उच्चभ्रू लोक मतदानाच्या दिवशी जाहिर केलेल्या सुट्टीत बाहेर फिरायला जातात, मतदानाच्या दिवसाची सुट्टी मतदानाचा हक्क बजावण्याऐवजी मजा मस्ती करण्यात घालवतात. जे लोक मतदान करण्याच्या लायक नाही असा समज होता तेच गरीब, अशिक्षित लोक मात्र उत्साहाने रांगा लावून मतदान करताना दिसतात. अशी ही विपरीत स्थिती आहे. आपले मत कोणालाही असो किंवा आपल्या मतदारसंघात उभ्या असलेल्या एकालाही नसो पण आपण कर्तव्य म्हणून मतदान केले पाहिजे कारण ते आपले कर्तव्य आहे. ते कर्तव्य लोकशाहीप्रती, देशाप्रती किंवा कोणत्या पक्षाप्रती नसते तर ते आपल्याप्रती असते, आपल्या हितासाठी असते. ही जाणीव ठेवून आवर्जून मतदान केले पाहिजे. आपले पुढील पाच वर्षांचे आयुष्य कसे असावे हे आपले मतदान ठरवत असते कारण आपल्या देशाचा कारभार पाहणारे कारभारी आपण मतदानातून निवडत असतो. मतदानाच्या अधिकाराचा अर्थ नीट समजून घेण्याची गरज आहे. भारताची लोकशाही ही लोकांनी चालवलेली राज्यपद्धती आहे. देशातला प्रत्येक नागरीक लोकसभेत जाऊन राजकीय कारभारावर चर्चा करणे शक्य नाही त्यासाठी त्याने आपले प्रतिनिधी लोकसभेत पाठवून त्यांच्या माध्यमातून आपल्या अडीअडचणी मांडाव्या, देशाचे राजाकारण चालवावे ही अपेक्षा असते. हे प्रतिनिधी जनतेप्रती आणि देशाप्रती इमानदार आणि प्रामाणिक असतील तरच देशाचा कारभार लोकांच्या हिताचा होईल. मात्र याबाबतीत प्रत्येक नागरिकाने मतदान करून आपले मत व्यक्त केले पाहिजे. जे लोक मतदान करणार नाहीत ते देशाच्या कारभाराच्या बाबतीत उदासीन आहेत असे म्हणावे लागेल. ही उदासीनता झटकून प्रत्येकाने आवर्जून मतदान केले पाहिजे.

आपले एक मत खूप महत्वाचे आहे कारण ते ठरवते की भविष्यात आपल्या देशाचे नेतृत्व कोण करेल. मतदानाचे महत्त्व प्रत्येकाने समजून घेणे गरजेचे आहे. दुर्दैवाने ३०% पेक्षा जास्त लोक मतदानाच्या दिवशी मतदान करत नाहीत. या लोकसभा निवडणुकीत आपली लोकशाही मजबूत राहावी यासाठी योग्य उमेदवार निवडण्याची ताकद तुमच्याकडे आहे. आपली लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी मतदान महत्त्वाचे आहे. जेव्हा ''माझ्या मताने फरक पडत नाही'' हा विचार आपल्या मनात येतो तेव्हा आपण खऱ्या अर्थाने लोकशाहीचे नुकसान करत आहोत हे आपण विसरता कामा नये. शासनाने मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. आपल्या एका मतामध्ये महत्त्वपूर्ण फरक पडण्याची क्षमता आहे. जर आपले मतदान आपण योग्य प्रतिनिधींना केले नाही तर तोच पक्ष आणखी पाच वर्षे सत्तेत राहील. जर देशतील शासन हे योग्य पद्धतीने चालत नसेल तर त्याला आपण जबाबदार आहोत कारण आपण त्यांना निवडून देताना योग्य ती भूमिका घेतलेली नसते. मतदान करतांना उमेदवारांबाबत असमाधानी असाल तर ठडळअ या पयार्याचा अवलंब करून आपण आपली ना पसंती दर्शवू शकता. नोटा याचा अर्थ वरीलपैकी कोणीही नाही, लोकशाही भक्कम करण्याच्या दृष्टीने आणि देशाला सर्वार्थाने सक्षम करण्यासाठी आपण निश्चितपणे मतदानाचा हक्क बजावलाच पाहिजे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेल्या राज्यघटनेनं आपल्या सर्वांना मतदानाचा मूलभूत अधिकार दिला आहे. जनतेने निवडून दिलेले लोकप्रतिनिधी देशाचे व राज्याचे राजकारण बनवतात. त्यामुळे मतदानाचा अधिकार हा अतिशय महत्त्वाचा आहे. राज्यघटनेनं दिलेल्या इतक्या महत्वपूर्ण अधिकाराची पायमल्ली होऊ देऊ नका म्हणून सर्वांनी मतदानाचा अधिकार बजावावा.


# BMC slaps notices on unregistered nursing homes in M-East ward



■ **MUMBAI :** The Brihanmumbai Municipal Corporation's (BMC) M-East ward health officials have sent notices to nine out of the 24 unregistered nursing homes functioning in the slum pockets of the ward. The M-East ward has a significant population residing in slums in areas of Govandi, Shivaji Nagar, Cheeta Camp, Vashi Naka and Baiganwadi. The BMC started the process of issuing notices earlier this month.Dr Sanjay Funde, the medical health officer of the ward, said, "We are still conducting inspections and notices will be served to more places. Subsequently, the case will be brought to the court under the Bombay Nursing Home Registration Act."

Dr Funde said that these unregistered facilities lack an approved building proposal plan. "Even as they have qualified doctors present. They are not permitted to operate on technical grounds," he said. The nursing homes cater to patients with malaria, typhoid and gastroenteritis. Just a couple of days ago, a social activist in Govandi, Mohammad Salim Abdul Ali Khan, sent a legal notice to state and BMC health officials based on an RTI response. The RTI response highlighted the total number of unregistered nursing homes with their names and addresses. Khan said that the notice provides the BMC 15 days' time to provide a response detailing the action taken. Failing to do so, he said, the matter would be taken to court. "These nursing homes pose a health risk to the public as their staff is likely to be unqualified. Moreover, the rates they charge are exorbitant despite being unregistered facilities," Khan said. The RTI data shows that of the 24 unregistered nursing homes in M-East ward, most are concentrated in Govandi, with some also in Mankhurd and Cheeta Camp. Khan said, "These facilities either need to be shut down or properly regulated to ensure they do not employ unqualified staff or doctors. The rates also need to be kept in check."

# NCB busts international drug syndicate, seizes 2 kg of MDMA



The Narcotics Control Bureau (NCB) in Mumbai busted an international drug conspiracy, seizing 2.170 kilograms of MDMA (commonly known as ecstasy) and arrested an African national. The drugs were worth approximately Rs 2 crore. The operation, which commenced in October 2023, was carried out following extensive technical and financial examinations by the NCB. On October 19, 2023, officials acted on intelligence and intercepted a parcel from the Netherlands at the Foreign Post Office in Mumbai. Upon closer inspection, what looked to be benign objects such as toys and crayons revealed a cleverly concealed stockpile of MDMA tablets. The shipment contained 4,970 MDMA tablets totalling 2.170 kilograms. "In pursuance of intensive technical collaboration with the financial investigation, NCB-Mumbai has successfully cracked an international syndicate which was involved in international drug trafficking. Based on technical intelligence, information was gathered wherein a parcel containing a huge quantity of high-value drugs was being sourced from the Netherlands and transported into Mumbai," NCB said in its statement. It added, "An active analysis led to the identification and detection of the said parcel on 19.10.2023 at Foreign Post Office, Mumbai. When the parcel was unboxed, the contents had non-suspecting items such as toys, crayons, pens, etc. However, on closer examination, it was observed that the packaging cardboard box was abnormal. When one side was cut open, layers of multi-coloured MDMA / ecstasy tablets were found concealed between the layers of flap. Accordingly, when other flaps of the package box were cut open, furthermore MDMA tablets were recovered. A total of 4970 MDMA/ Ecstasy tablets weighing 2.170 kgs were seized." The inquiry revealed a sophisticated worldwide drug trafficking network, forcing officials to look further into the syndicate's operations. Despite efforts to avoid detection, a thorough investigation revealed a money trail that led to the identity of an African national living in Navi Mumbai. The suspect, known as B.O. Afo, was captured at his home, where additional incriminating evidence was discovered. Furthermore, other bank accounts, both domestic and international, associated with the suspect have been identified for inquiry.

Further investigation found that Afo has been in India since 2018, despite the expiration of his visa. This discovery highlights the syndicate's worldwide nature and operations in India. The recovered medicines, intended for distribution in many cities including Mumbai, Pune, Bengaluru, Goa, and Hyderabad, illustrate the widespread reach of the syndicate. Since the quantity of the drugs was huge and had international linkage, an extensive investigation was initiated. The syndicate had carefully maintained the technical evasive manoeuvre to avoid any identification. However, in the course of an in-depth investigation, credible technical analysis led to the identification of a financial trail. The information was further developed which led to the identification of an African national based in the Navi Mumbai area, it further read. "Prolonged surveillance and discreet analysis inferred the convincing data after which the African national named B.O.Afo was intercepted at his house. Incriminating evidence along with multiple bank details of international and domestic banks have been collected which are presently subject to further investigation. It has been noted that BO Afo came to India in 2018 and has been staying since then even after the expiry of the Visa. His other documents are also being verified. The seized drug would have been distributed to multiple cities like Mumbai, Pune, Bengaluru, Goa, Hyderabad, etc. A further in-depth investigation is underway to identify the other key associates of the larger syndicate," the statement further read. Amit Ghawate, Additional Director of NCB Mumbai, emphasised the thorough scope of the ongoing investigation, which aims to identify all major syndicate associates.

# Ajit Agarkar bombarded with desperate 'Rishabh Pant, Shivam Dube' T20 World Cup pleas from former India cricketers



The ongoing IPL 2024 is setting the template up real nice for India's T20 World Cup squad selection, and with certain players becoming unstoppable as the tournament progresses, BCCI chairman of selectors Ajit Agarkar and his panel are having happy headaches. While certain players pick themselves, a whole lot of contenders will be vying for selected spots. The wicketkeeper and all-rounder positions are perhaps the most hotly-contested at the moment. The race for the wicketkeeper's slot pits Rishabh Pant against Sanju Samson and KL Rahul, while the all-rounder battle sees Hardik Pandya face competition from Shivam Dube and Ravindra Jadeja. And this is where Agarkar and his colleague's job becomes trickier. On current form, Pant and Samson, in an ideal world, start favourites. Although if it comes to picking one, the Delhi Capitals captain is likely to get the nod. With three half-centuries, Pant has scored almost 400 runs in IPL 2024 with three half-centuries but none more comprehensive and fluent than the knock he played Wednesday evening against Gujarat Titans.

Pant hammered an unbeaten 88 off 43 balls, lacing the innings with five fours and eight sixes. Watching Pant's exploits, especially in the final over, as his strike-rate rose exponentially, former India batter Mohammad Kaif indirectly conveyed a message to 'selectors' explaining how such insane hitting cannot be ignored when the team is picked for the T20 World Cup. "Rishabh Pant had a strike-rate of 154 [at the beginning]. When selectors sit to pick the T20 World Cup squad, they will notice this. It [strike-rate] matters a lot at No 5 and 6. He is going to play at either 5 or 6 for India. Not in top 3 or 4. This kind of a strike-rate is icing on the cake," Kaif said on commentary, which was captured by Star Sports.

"This is not just batting; this is a statement from Pant. His strike-rate touched 200 with 7 sixes. Where are you going to bowl to him? He won't spare you. You cannot write off a batter like him. A guy who was injured and away for over a year, it took him just two games to come to form."

## भिवंडीतील शिक्षकाचा रेल्वेतून पडून मृत्यू

■ **भिवंडी** : कामतघर येथे राहणारा शिक्षक अभय संजय प्रजापती (२४) यांचा रेल्वेतून उतरताना खाली पडून मृत्यू झाल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. एकुलता एक मुलगा असल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे कामतघर परिसरात शोकाकुल वातावरण पसरले आहे. हैदराबाद येथील टेक्निकल महाविद्यालयात अभय शिक्षक आहेत. स्वतः चा वाढदिवस असल्याने आई-वडिलांच्या आग्रहाने ते भिवंडीत घरी आले. १५ एप्रिल रोजी वाढदिवस झाल्यानंतर ते दोन दिवसांपूर्वी हैदराबाद येथे जात असताना रेल्वेतून खाली पडून त्यांचा मृत्यू झाला. बुधवारी दुपारी शोकाकुल वातावरणात त्यांच्या पार्थिवावर भिवंडीतील चंदनबाग येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान एकुलता एक मुलगा असल्याने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यामुळे कामतघर परिसरात शोकाकुल वातावरण पसरले आहे.

# अनधिकृत ढाब्यांवर येणार अंकुश !

## सर्वेक्षण करण्याचे कल्याण-डोंबिवली पालिका आयुक्तांचे आदेश

■ **कल्याण** : कल्याण-डोंबिवलीत अनधिकृत हॉटेल, ढाब्यांची संख्या दिवसेंदिवस फोफावत चालली आहे. त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टिकोनातून पालिकेतर्फे त्यांना परवाने देण्याचे धोरण लवकरच लागू करण्यात येणार आहे. यासाठी पालिका क्षेत्रांतील अनधिकृत हॉटेल्स, ढाब्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे आदेश आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी दिले आहेत. त्यामुळे अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या हॉटेल्स, ढाब्यांवर पालिकेचा अंकुश येणार आहे.

पालिका क्षेत्रात मोकळ्या, तसेच खासगी जागेत सर्रास अनधिकृत हॉटेल, ढाबे उभारले जात आहेत. सद्यस्थितीत सुमारे ३०० हून अधिक अनधिकृत हॉटेल, ढाबे आहेत. यामध्ये कोणत्याही प्रकारची परवानगी न घेताच खाद्यपदार्थ तसेच दारू विक्री केली जाते. वास्तविक पाहता त्यांच्यावर अन्न व औषध प्रशासन तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून कारवाई होणे अपेक्षित आहे. मात्र या दोन्ही विभागांकडून डोळेझाक केली जाते. त्यामुळे शहरातील अधिकृत परवाने प्राप्त हॉटेल्स, रेस्टॉरंट-बार यांच्या व्यवसायावर मात्र प्रतिकूल परिणाम होत आहे. त्यांच्यावर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याने शहरातील हॉटेल्स ओनर्स असोसिएशनने हॉटेल्स बंद आंदोलन पुकारण्याचा इशारा दिला होता. त्याचप्रमाणे शहरांतील




### लवकरच सर्व्हेक्षण सुरू होणार

■ यासंदर्भात पालिकेच्या बाजार आणि परवाना विभागाचे प्रभारी सहाय्यक आयुक्त प्रसाद ठाकूर यांनी सांगितले की, अनधिकृत हॉटेल, ढाब्यांवर नियंत्रण ठेवण्याच्या धोरण ठरविले जात आहे.

■ त्या दृष्टिकोनातून आयुक्तांनी त्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार लवकरच सर्व्हेक्षण सुरू केले जाणार आहे. यामध्ये पालिका क्षेत्रातील अनधिकृत हॉटेल, ढाब्यांची प्रत्यक्ष भेट देऊन माहिती संकलित केली जाणार आहे.

लोकप्रतिनिधींनीही अनधिकृत हॉटेल्स, ढाब्यांवर कारवाई करण्याची केली होती. त्याची दखल घेत आयुक्त आयुक्त डॉ. इंदुराणी जाखड यांनी यासंदर्भात बैठक घेतली होती. यामध्ये शहरांतील अनधिकृत हॉटेल, ढाब्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी धोरण ठरविण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. अन्य व्यवसायिकांप्रमाणेच अनधिकृत हॉटेल, ढाब्यांनाही व्यवसाय परवाने दिल्यास पालिकेच्या उत्पन्नात भर पडणार आहे. त्यामुळे आयुक्तांनी प्रथम अनधिकृत हॉटेल, ढाब्यांचे सर्व्हेक्षण करण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे पालिका क्षेत्रांत अनधिकृतपणे खाद्यपदार्थ विक्री करणाऱ्या हॉटेल, ढाब्यांना एकप्रकारे लगाम बसणार असून पालिकेतर्फे त्यांच्यावर नियंत्रणही ठेवले जाणार आहे.

## १२ उद्यानांचा गैरवापर होताना पालिकेचे डोळे झाक



■ **मुंबई** : 'वर्ल्ड रिन्यूअल स्पिरिच्युअल ट्रस्ट'द्वारे मुंबई महानगरपालिकेच्या १२ उद्यानांचा १६ वर्षे गैरवापर केला जात असताना त्याकडे डोळेझाक करणाऱ्या महापालिका प्रशासनाच्या भूमिकेवर उच्च न्यायालयाने बुधवारी नाराजी व्यक्त केली.या खासगी संस्थेवर कराराचा भंग केल्याप्रकरणी कारवाई का केली नाही, अशी विचारणा करून महापालिका आयुक्तांनीच त्याबाबत स्पष्टीकरण द्यावे, असे आदेश न्यायालयाने दिले. त्याच वेळी संस्थेलाही नोटीस बजावून भूमिका स्पष्ट करण्याचे आदेश दिले.

ही उद्याने विकास आणि देखरेखीसाठी या खासगी संस्थेला देण्यात आली होती. मात्र, खासगी संस्थेतर्फे या उद्यानांत व्यावसायिक उपक्रम राबवले जात होते. शिवाय, तेथे कायमस्वरूपी बेकायदा बांधकामेही बांधल्याचे महापालिकेने चौकशी अहवालात म्हटल्याची न्यायालयाने दखल घेतली. तसेच, संस्थेला उद्यानांवर योग धारणेसारखे व्यावसायिक उपक्रम चालवण्यास परवानगीच कशी दिली गेली? उद्यानांत कायमस्वरूपी बांधकामे बांधू कशी दिली? महापालिका प्रशासनाच्या डोळ्यासमोर संस्थेकडून कराराचे सर्रास उल्लंघन सुरू होते. तरीही, संस्थेवर कारवाई का केली नाही? कारवाईचा प्रस्ताव मांडला गेला का? अशी प्रश्नांची सरबत्तीही मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती आरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाने महापालिका प्रशासनाला केली.

## मोबाईल खेचून पोबारा केल्याच्या २ घटना

■ **ठाणे** : नौपाडा पोलीस ठाणे हद्दीत दुचाकीवरील चोरट्यांनी मोबाईल घेऊन पोबारा केल्याची तक्रार रविवारी यश जैन याचा ३५ हजाराचा, तर सोमवारी कौसर मन्सूर याचा २५ हजाराचा मोबाईल चोरल्याची तक्रार दाखल केली आहे. दुचाकीवरून आलेल्या दुकलीने मोबाईल घेऊन पोबारा केल्याच्या दोन घटना विविध भागात घडल्या. यात तक्रारदार कौसर मन्सूर (२९) याचा नितीन कंपनीकडे जाणाऱ्या रोडवर मान टपरीवाला याठिकाणी मोबाईल घेऊन चोरटे तीन पेट्रोल पंपच्या दिशेने पळाले. या प्रकरणी सोमवारी दोघांविरोधात गुन्हा नोंदवला. तर तक्रारदार यश सुनीलकुमार जैन हा मुलुंडला जाण्यासाठी रिक्षाने निघाला असता, नाशिक-मुंबई वाहिनीवर तीन हात नाका येथे ब्रिजवर दुचाकीवरील चोरट्याने मोबाईल खेचून पलायन केले. याप्रकरणी अज्ञात दोन चोरट्यांविरोधात नौपाडा पोलीस ठाण्यात रविवारी गुन्हा नोंद केला आहे.

# ठाण्यातील १४ ठिकाणी दरडींची टांगती तलवार

## पावसाळ्यापूर्व केलेल्या पालिका सर्व्हेतून माहिती

■ **ठाणे** : ठाणे महापालिकेने यंदाच्या पावसाळ्यापूर्वीच केलेल्या सर्व्हेत दरड कोसळण्याचा धोका असलेल्या १४ भागांची यादी तयार केली आहे. अद्यापही या सर्व ठिकाणी हजारो नागरिक जीव मुठीत घेऊन राहत आहेत. मान्सूनच्या पाश्वभूमीवर डोंगर माथ्यावर अनधिकृत रहणाऱ्या नागरिकांचाय सुरक्षेचा प्रश्न कायम आहे. म्हणून अशी घरे रिकामी करण्यासाठी ज्या प्राधिकरणाच्या जागावर घरे उभी आहेत. त्या संबंधित प्राधिकरणाला त्यांच्यावर कारवाई करून ती रिकामी करण्याच्या सूचना केल्या आहेत.

पालिकेच्या माध्यमातून मान्सूनपूर्व आढावा बैठक घेऊन नाल्यालगत आणि डोंगरवर त्याच्या पायथ्याशी असलेल्या झोपडपट्ट्यांची यादी तयार करण्यात येते. पावसाळा आला की, पालिकेच्या माध्यमातून ही यादी तयार केली जाते. दरवर्षी येथील रहिवाशांना नोटिसा बजावल्या जातात. घरे रिकामी करण्याचे सांगितले जाते. पावसाळ्याच्या काळात अशा ठिकाणी भूस्खलन होण्याची भीती असते. यापूर्वी अशा स्वरूपाच्या घटना घडलेल्या आहेत.

विशेष म्हणजे भूस्खलनाचे संकट डोक्यावर असतानाही नागरिक याठिकाणी राहत आहेत. या नागरिकांकडे धोकादायक ठिकाणी राहण्यावाचून दुसरा पर्याय ही नाही. आशा वेळी कुटुंबकबिला घेऊन जायचे कुठे, हा प्रश्नही त्यांच्यापुढे आहे. परिणामी स्वतःचा जीव धोक्यात घालून ते राहत आहेत.

पालिका हद्दीत दरड कोसळण्याचा धोक असलेली १४ ठिकाणी पुढीलप्रमाणे आहेत : मुंब्रा, लोकमान्यनगर, कळवा, माजिवडा मानपाडा या भागांतील काही ठिकाणांचा यात समावेश आहे. त्यानुसार लोकमान्य नगर भागातील गुरुदेव आश्रम जवळ, उपवन, माजिवडा मानपाडा प्रभाग समितीत डोंगरीपाडा, पातलीपाडा आणि कळशीपाडा यांचा समावेश आहे.

कळव्यात-आतकोनेश्वर नगर, पौंड पाडा, शिवशक्ती नगर, घोलाई नगर, वाघोबा नगर, भास्कर नगर यांचा समावेश आहे. मुंब्रातील आझादनगर, गावदेवी मंदीरलगत, केणी नगर, सैनिक नगर आणि कैलास नगर यांचा समावेश आहे.



■ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, यातील काही भाग वनविभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित येतात. त्यानुसार अनधिकृत घर खाली करण्याबाबत सूचना वनविभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाला केली आहे. मुळात डोंगरमाथ्यावर धोकादायक ठिकाणी आशा वस्त्या जेव्हा उभ्या राहतात, तेव्हाच दक्षता घेणे गरजेचे आहे. तेव्हा केलेल्या दुर्लक्षामुळे त्याची मोठी किंमत नंतर मोजावी लागते. परिणामी वेळीच अटकाव घालणे गरजेचे आहे.

# रूग्णाच्या नातेवाईकांचा डॉक्टरला चावा

## डोंबिवलीतील रुग्णालयात झालेला प्रकार सीसीटीव्हीत कैद

■ **डोंबिवली**: डोंबिवली पूर्वेतील स्टार कॉलनी येथील आरोग्यम रुग्णालयात डॉक्टरसह कर्मचाऱ्याला रुग्णाच्या नातेवाईकांनी मारहाण करत चावा घेतल्याची धक्कादायक घटना घडली आहे. ही घटना सीसीटीव्हीमध्ये कैद झाली आहे. याप्रकरणी मानपाडा पोलीस ठाण्यात रुग्णाच्या नातेवाईकांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

डोंबिवली पूर्वेतील स्टार कॉलनी परिसरात आरोग्यम हॉस्पिटल आहे. शनिवारी संध्याकाळी डोंबिवलीत राहणारे राज सिंह पत्नी ज्योतीला घेऊन हॉस्पिटलमध्ये आले होते. ज्योती सिंह हिला पोटात दुखण्याचा त्रास होत होता. सोबत राजची आई देखील होती. हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी ज्योतीवर उपचार केले. थोड्या वेळानंतर ज्योतीचा त्रास कमी झाला. त्यामुळे डॉक्टरांनी तिला डिस्चार्ज देण्यास सांगितले. मात्र डिस्चार्ज देण्याची प्रक्रिया सुरू असताना पुन्हा ज्योतीच्या पोटात दुखण्याचा त्रास सुरू झाला. डॉक्टरांनी ज्योतीला ॲडमिट करून सिटी स्कॅन आणि इतर टेस्ट करायला सांगितले. मात्र यावरून ज्योतीचे पती राज सिंह आणि सासू सुशीला सिंह या दोघांनी डॉक्टर आणि हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांसोबत वाद घालायला सुरुवात केली.




■ या वादाचे पर्यवसान हारामारीत झाले. यादरम्यान राज आणि सुशीला यांनी हॉस्पिटलमधील डॉ. नितीन खोटे आणि इतर दोन कर्मचाऱ्यांच्या चावा घेतला. हा धक्कादायक प्रकार घडल्यानंतर हॉस्पिटल प्रशासनाने या प्रकरणात मानपाडा पोलीस ठाण्यात तक्रार नोंदविली. याप्रकरणी मानपाडा पोलिसांनी ज्योतीचे पती राजसिंह आणि राजची आई सुशीला यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या घटनेमुळे खासगी रुग्णालयातील डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांत खळबळ उडाली आहे.

# कापूरबावडी-कोलशेत-ढोकाळी रोड वाहतुकीस खुला

## जेसीबीच्या सहाय्याने भिंत हटवली

■ **ठाणे** : वाहतुकीला शिस्त लावण्याच्या नावाखाली एक वर्षापासून कापूरबावडी पूलाखालून कोलशेत-ढोकाळी कडे जाणारा उजवीकडील मार्ग प्रशासनाने भिंत घालून बंद केला आहे. अखेर बुधवारी ही भिंत जेसीबीच्या सहाय्याने हटवून हा मार्ग वाहतुकीसाठी खुला केला आहे.

शहरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी, तसेच वाहतुकीला शिस्त लागण्यासाठी मागील वर्षी शहरातील अनेक रस्त्यांवर बदल केले. कापूरबावडी पुलाखालून कोलशेत-ढोकाळी कडे जाणारा उजवीकडील मार्गही वाहतूक विभाग



आणि ठाणे पालिका प्रशासनाने बंद केला होता. हा मार्ग बंद झाल्याने कोलशेत, ढोकाळी, मनोरमानगर, मानपाडा, आझादनगर, ब्रह्मांड, लोढा अमारा येथील सुमारे पावणेदोन लाख रहिवाशांची यामुळे फरफट होत होती. मार्ग बंद झाल्याने हायलँड अथवा बाळकूम येथील राम मारुती रोडने रहिवाशांना प्रवास करावा लागत होता. कापूरबावडी पुलाखालून कोलशेत-ढोकाळी कडे जाणारा हा मार्ग जरी बंद केला असला तरी कापूरबावडीच्या विरुद्ध दिशेने या मार्गावर अनेकजण वाहतूक प्रवास करत असल्याने कापूरबावडी येथे वाहतूक कोंडी पूर्वीप्रमाणे होत होती. तसेच वयोवृद्ध नागरिक, महिला आणि शालेय मुलांना यामुळे नाहक त्रास सहन करावा लागत होता.

◆स्थानिक लोकप्रतिनिधी या नात्याने माजी स्थायी समिती सभापती संजय भोईर, माजी विरोधी पक्षनेते देवाराम भोईर यांनी पालिका आयुक्त, वाहतूक विभागाच्या पोलीस उपायुक्तांकडे सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला होता. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडेही याबाबत चर्चा करण्यात आली. काही दिवसांपूर्वी हायलँड येथील मैदानात शिवसेनेने आयोजित केलेल्या महोत्सवात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपस्थित होते. तेव्हाही संजय भोईर यांनी हा रस्ता खुला करण्याची मागणी केली होती. बुधवारी अखेर हा रस्ता खुला करण्यात आला.

# लोकलमधील एसी बंद पडल्याने महिलेला आली भोवळ

## यंत्रणेतील बिघाडाचा प्रवाशांना मनःस्ताप

■ **कल्याण** : उन्हाचा तडाखा वाढला आहे. त्यामुळे अनेक प्रवासी थोडा सुखाचा प्रवास व्हावा म्हणून महागड्या एसी लोकल ट्रेनमधून प्रवास करतात. मात्र एसी लोकलमधील वातानुकूलन यंत्रणेत बिघाड झाल्याने एका महिलेला मंगळवारी भोवळ येऊन ती खाली कोसळल्याची घटना कल्याण-सीएसएमटी दरम्यान घडली. उपस्थितांनी तात्काळ तिच्यावर प्रथमोपचार केले. त्यानंतर महिला शुद्धीत आली.

सोमवारपासून कल्याण-सीएसएमटी एसी लोकलमधील वातानुकूलन यंत्रणेत बिघाड झाला आहे. त्यामुळे एसी लोकलमध्ये देखील प्रवाशांना गर्दी, घामाच्या धारा यांचा सामना करत प्रवास करावा लागत आहे. त्यातच एसी लोकलमध्ये दरवाजे बंद असल्याने बाहेरून कोणतीही हवा आतमध्ये येत नाही. त्यामुळे अनेक प्रवाशांचा अक्षरक्षा जीव गुदमरतो आहे. यातच मंगळवारी एका महिलेला भोवळ आली.

चक्कर येऊन ती खाली कोसळल्याने उपस्थितांनी तात्काळ तिच्यावर प्रथमोपचार केले. त्यानंतर ती शुद्धीत आली. कल्याणहून सीएसएमटीसाठी जाणाऱ्या ८.५४ च्या एसी लोकल ट्रेनमध्ये हा प्रकार घडला. या ट्रेनमधील ७०५२ सी डब्यातील वातानुकूलन यंत्रणा बिघडली असून ती तातडीने दुरुस्त करण्याची मागणी प्रवाशांनी समाजमाध्यमांद्वारे रेल्वे प्रशासनाकडे केली.

कल्याणहून ही एसी लोकल ट्रेन अनेक चाकरमानी पकडतात. त्यामुळे सकाळच्यावेळी प्रवाशांची मोठी गर्दी असते. या कोचमध्ये एसी नसल्याने प्रवाशांचा जीव गुदमरून अनेकांना श्वास घेण्यास त्रास होत होता. एसी लोकल ट्रेनची यंत्रणा सुस्थितीत आहे की नाही हे रोज पाहणे रेल्वेचे काम आहे. जर काही कारणास्तव यंत्रणा बंद असेल तर 'एसी' लोकलचे दरवाजे उघडे ठेऊन तरी चालवावी.




# गुन्हे शाखेच्या संयुक्त कारवाईत शस्त्रसाठा जप्त

■ **ठाणे** :खंडणी विरोधी पथक, विशेष कृती दल, गुन्हे शाखा व युनिट ५ च्या दोन विविध ठिकाणच्या कारवाईत चार गावठी पिस्तुले आणि २२ काडतूसांसह एक मॅगझिन हस्तगत करण्यात यश लाभले. तसेच साकेत रोड येथे गुरुवार, १८ एप्रिल रोजी सापळा रचून शंभु सुरेश महतो (३५) याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून एकूण ४ पितुल, २ गावठी कट्टे, १ मॅगझिन व १८ जिवंत काडतुसे हस्तगत करण्यात आली. रोड नं. १२, वागळे इस्टेट येथेही दोन गावठी पिस्तुल आणि चार काडतुसांसह शेहरबहादुर नवबहादुर कारकी याला बेड्या ठोकण्यात आल्या.





लोकसभा निवडणूक प्रक्रिया २०२४ कायदा व सुव्यवस्थेस बाधा न येता शांततेत पार पडावी, यासाठी पोलीस आयुक्त सारे, ठाणे शहर यांनी गुन्हे शाखेच्या पथकांना जास्तीत जास्त अवैध शस्त्र, अंमली पदार्थ विरोधी कारवाया करण्याबाबत सक्त आदेश दिले. त्यानुसार पोलीस पथकांनी सराईत गुन्हेगारांची झाडझडती आणि पाळत ठेवण्यास सुरू केली. यामध्येच खंडणी विरोधी पथक

आणि विशेष कृती दलाच्या पथकाला शंभु महतो मोठ्या प्रमाणावर अवैध अग्निशस्त्रे, काडतुसे, गावठी कट्टे घेऊन विक्रीसाठी साकेत रोड, राबोडी, ठाणे येथे येणार असल्याच्या माहिती मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचून शंभु सुरेश महतो या विक्रोळी पूर्व येथीला व्यक्तीला अटक केली. त्याच्याकडून एकूण ३ लाख ४० हजाराचा शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे. त्याला २५ एप्रिलपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.तर गुन्हे शाखेच्या दुसऱ्या कारवाई युनिट ५ च्या पथकाने वागळे इस्टेट, रोड नं १२ येथील नटवर हॉटेल समोर सापळा रचून आरोपी शेहरबहादुर नवबहादुर कारकी यास विक्रीसाठी आणलेल्या दोन गावठी पिस्तुल व चार काडतुसांसह अटक केली.

# प्रवाशांचे लोकलहाल संपणार तरी कधी?

■ **पालघर** : पालघर लोकसभा क्षेत्रातील वैतरणापासून डहाणूपर्यंतचे नागरिक जे दररोज पश्चिम रेल्वेने मुंबई, गुजरातकडे नोकरी निमित्ताने प्रवास करत असतात. मात्र हा प्रवास दिवसेंदिवस जिकिरीचा होत आहे. लोकप्रतिनिधी ही समस्या सोडवण्यात सपशेल अपयशी ठरले आहेत. या निवडणुकीनंतर तरी ही समस्या सुटेल की नाही, याबद्दल सामान्य जनतेमधून शंका व्यक्त केली जात आहे.

लोकल गाड्यांना सायडिंगला तिष्ठत ठेवू नये, तिकीट खिडक्या आणि एटीव्हीएम (विनाचालक तिकीट मशीन) उपलब्ध कराव्यात, अशा मागण्या प्रलंबितच आहेत. डहाणू ते वैतरणा रेल्वे सेवेला उपनगरी रेल्वेचा दर्जा असला तरी येथील सोयीसुविधांबाबत हा भाग अजून मागासलेलाच आहे. या भागास पश्चिम रेल्वेकडून सापत्न वागणूक येथील प्रवाशांना देण्यात येते. रेल्वे ट्रॅकची वाहतूक १०० टक्क्यांपेक्षा अधिक असल्याचे कारण दिले जाते.

तरीही वंदेभारत शताब्दी हॉलिडे स्पेशल आणि इतर लांब पल्ल्याच्या गाड्या नव्याने सुरू करताना हा अडथळा आडवा येत नाही. मात्र येथे एखादी लोकलची फेरी वाढवायला सांगितल्यावर ट्रॅक खाली नसल्याचे कारण देऊन प्रवाशांची बोळवण केली जाते. अधिकारी वर्ग लोकप्रतिनिधींनासुद्धा जुमानत नसल्याचे दिसत आहे.

सकाळी ७.०५ ची डहाणू-विरार उपनगरीय सेवा कोरोना काळानंतर बंद झाल्यानंतर विरार, वसई भागात नोकरीसाठी जाणाऱ्या प्रवाशांच्या हालाला पारावर उरला नाही. ही गाडी जर सुरू झाली व त्या भागात नागरिकांची गरज दूर होण्यास मदत होईल.




# आठ प्रभाग समितींमध्ये नालेसफाई २७ एप्रिलपासून होणार सुरू

■ **ठाणे** :महापालिका क्षेत्रात दिवा प्रभाग समिती वगळता उर्वरित आठ प्रभाग समितींमध्ये शनिवार, २७ एप्रिलपासून नालेसफाईच्या कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली आहे. यासाठी अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. दिवा येथे अद्याप या कामाला ठेकेदार मिळाला नाही.

पालिकेने मार्च महिन्यात नालेसफाईच्या कामांच्या नऊ प्रभाग समितीनिहाय निविदा काढल्या होत्या. महापालिकेने टाकलेल्या काही अटी आणि शर्तीमुळे ठेकेदारांनी नालेसफाईच्या कामांकडे पाठ फिरविल्याचे दिसून आले. यंदा खर्चातही ३ कोटींची कपात केली होती. त्यामुळे ठेकेदारांनी पाठ फिरवली होती. पालिकेने वारंवार निविदेला मुदतवाढ दिली. नंतर वागळे इस्टेट आणि लोकमान्यनगर याठिकाणीच ठेकेदारांनी निविदा भरल्याचे दिसून आले. पालिकेने पुन्हा निविदेला मुदतवाढ देत २२ एप्रिलपर्यंत वाढविली होती. ही मुदतवाढ देत असतांना निविदेत असलेली आपत्कालीन परिस्थितीत वर्षभर नालेसफाई करण्याची अट शिथिल करण्यात आली. अट शिथिल करण्यात आल्याने अखेर दिवा प्रभाग समिती वगळता उर्वरित आठ प्रभाग समितींना ठेकेदार मिळाले आहेत. त्यामुळे शनिवारपासून नालेसफाईच्या कामांना सुरुवात होणार असल्याची माहिती पालिका सूत्रांनी दिली.

### दिव्यात मात्र अद्याप ठेकेदार नाही



■ माजिवडा मानपाडा प्रभाग समितीमधून नालेसफाईच्या कामांना सुरुवात होणार आहे. पलिका हद्दीतील कळवा प्रभाग समिती सर्वाधिक २०१ नाले असून त्याखालोखाल दिव्यात १३१, नौपाडा प्रभाग समितीत ४९, वागळे इस्टेटमध्ये ३८, लोकमान्य-सावरकरात ३४, उथळसमध्ये ३४, वर्तकनगरात २९, माजीवाडा- मानपाडा ४४, मुंब्र्यात ८० नाले असल्याची नोंद आहे.

## क्षुल्लक वादातून दोन महिलांना मारहाण

■ **बोईसर** : एकाच इमारतीत राहणाऱ्या दोन कुटुंबांत झालेल्या क्षुल्लक वादाचे पर्यवसान हाणामारीत झाले. यामध्ये आई व डॉक्टर मुलगी गंभीर जखमी झाल्याची घटना बोईसर जवळील खैरापाडा भागात घडली आहे. याप्रकरणी एकाच कुटुंबातील तिघांवर बोईसर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. खैरापाडा येथील भक्ती निवास इमारतीत राहणाऱ्या पाटील कुटुंबात पूर्वीपासून वाद सुरू आहे. २३ एप्रिल रोजी संध्याकाळी विमल मधुकर पाटील (६०) आणि त्यांची मुलगी डॉ. सोनाली मधुकर पाटील या इमारतीच्या जिन्यावरून खाली उतरत असताना त्यांचा तेजल पाटील हिला धक्का लागला. या कारणावरून तेजल प्रशांत पाटील आणि तिचे सासरे प्रकाश पाटील व सासू प्रतिभा प्रकाश पाटील यांनी विमल पाटील व डॉ. सोनाली पाटील यांना इमारतीच्या आवारात लाकडी बॅट व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. याप्रकरणी जखमीं महिलांना उपचारासाठी बोईसरमधील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.